Impact Factor : 0.4521 (UIF)
Volume - 3 | Issue - 2 | October – 2016

# डॉ. बाबासाहेब आबेंडकरांचे उर्जाविषयक विचार व धोरण

प्रा.हरिदास जाधव
इतिहास विभागप्रमुख, चां. ता. बोरा महाविद्यालय, शिरुर जि.पुणे

## प्रस्तावना:-

आधुनिक भारताच्या जडणघडणीत डॉ.बाबासाहेब आबेंडकराचे योगदान सर्वश्रुत आहे. डॉ.बाबासाहेबांनी राज्यघटना, कायदा, धर्म, अर्थकारण, राजकारण, समाजकारण, पत्रकारिता इ. विविध क्षेत्रात मूलगामी विचार मांडून सामाजिक परिवर्तनासाठी अविरतपणे प्रयत्न केले. डॉ.बाबासाहेबांनी ९ मे १९१३ रोजी कोलंबिया विद्यापीठातील मानववंश विभागाच्या अभ्यास मंडळापुढे वाचलेल्या 'भारतातील जाती' या निबंधापासून ते १९५६ साली सारनाथ येथे केलेल्या भाषणापर्यंत त्यांचे विचार मोठया प्रमाणावर उपलब्ध होतात. डॉ.बाबासाहेबांनी लिहिलेले अनेक संशोधनात्क ग्रंथ, निरनिराळया ठिकाणी वाचलेले अभ्यासपूर्ण निबंध, वेगवेगळया सामाजिक—राजकीय चळवळींमध्ये कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना व्यक्त केलेले विचार, विविध भाषणे तसेच सामाजिक, आर्थिक आणि राजकीय विषयांवरील सुस्पष्ट विचार यांचा समावेश होतो.

## सर्व क्षेत्रातील मूलगामी विचार:

डॉ.बाबासाहेब आबेंडकरांनी राष्ट्रीय एकात्मता, देश, धर्म व संस्कृती इ.बाबतचे मूलगामी विचार आजही प्रेरणादायी आहेत. या सर्व विचारांमध्ये त्यांच्या ठायी असलेले सदैव राष्ट्रहिताचे भान प्रकर्षाने जाणवते.[१] सामाजिक, राजकीय व तात्विक पातळीवर दलितांचे प्रश्न हाताळत असतानांच त्यांनी भारतीय समाजातील जातीव्यवस्थेच्या संदर्भात मांडणी करुन जातीचा प्रश्न समाज परिवर्तनाच्या लढयात केंद्रस्थानी आणण्याचे महत्वाचे कार्य केले. अस्पृश्यता आणि जाती प्रथा यांची ऐतिहासिक चिकित्सा करतानाच जातीव्यवस्थेच्या अंतासाठी धर्मशास्त्र, समाजमन, आणि प्रस्थापित सत्तासंबंध या तिन्हीमध्ये आमूलाग्र फेरबदल घडवून आणावे लागतील अशी डॉ.बाबासाहेब आबेंडकरांची मांडणी होती. आधुनिक भारताच्या संदर्भात सामाजिक क्रांतीचा विचार मांडून त्या दिशेने कृती करणारे राजकीय नेते आणि तत्वज्ञ म्हणून डॉ. आबेंडकरांचे स्थान निर्विवादपणे महत्वाचे आहे.[२] एके ठिकाणी डॉ.आबेंडकर म्हणतात की, ''जगातील इतर देशांमध्ये सामाजिक क्रांत्या झाल्या पण भारतात सामाजिक क्रांत्या का झाल्या नाहीत? हा प्रश्न मला सारखा अस्वस्थ करीत असतो. त्याला केवळ एकच उत्तर मी देऊ शकतो आणि ते असे की, या चातुर्वण्याच्या नतदृष्ट पध्दतीमुळे प्रत्यक्ष कृती करण्यास हिंदूचे खालचे वर्ग पूर्णपणे असमर्थ बनविले गेले. ते शस्त्र धारण करु शकत नव्हते आणि शस्त्राशिवाय बंड करु शकत नव्हते.''[३] अशा समाजातील लोकांना तत्कालीन समाज व्यवस्थेविरुध्द बंड करुन आपले हक्क मिळविण्याचे सामर्थ्य डॉ. बाबासाहेबांनी दिले.

## अर्थकारण विषयक विचार

डॉ.बाबासाहेब आबेंडकर हे अर्थशास्त्राचे गाढे अभ्यासक व व्यासंगी विद्वान होते. कोलबिंया विद्यापीठात एम.ए च्या पदवीसाठी '' प्राचीन भारतीय व्यापार '' व पीएच.डी. साठी '' ब्रिटिश हिंदुस्थानातील प्रांतिक अर्थरचनेची उत्क्रांती '' असे त्यांचे विषय होते. तर डी.एस्सी. साठी त्यांनी लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये 'रुपयांचा प्रश्न' हा प्रबंध लिहिला. त्यांच्या या अर्थविषय ज्ञानामुळे भूमिहिन मजूर,लहान जमीनदार, खोती पध्दती, महार वतन, सामुदायिक शेती, जमिन महसूल आणि जमीनदार शाहीचे उच्चाटन या विषयांवर त्यांनी सातत्याने आपले विचार मांडले होते. अस्पृश्य समाजात भूमिहिन मजुरांचीच संख्या अधिक असल्याने त्यांनी या विषयांवर अधिक लक्ष केंद्रित केले होते. याशिवाय

देशातील उद्योगधंद्यांचे राष्ट्रीयकरण, अन्नधान्याचा प्रश्न, समाजवाद, सामाजिक समता या विषयांवरही त्यांनी प्रासंगिक विचार व्यक्त केल्याचे दिसून येते.[४]

## उर्जाविषयक विचार:

मानवी समाजाशी व सामान्य माणसाच्या दैनंदिन जीवनाशी निगडीत वेगवेगळया विषयांवरील विचारांबरोबरच आधुनिक काळात भेडसावणा—या उर्जेच्या प्रश्नांवर डॉ. बाबासाहेबांनी अत्यंत अभ्यासपूर्ण व कालसुसंगत विचार मांडले आहेत. वास्तविक पाहता उर्जा या विषयासंबंधी भारतात १९०५ पासून विचार सुरु झाला होता.तत्कालीन ब्रिटिश सरकारने 'वीज विकासाचे प्रकल्प' प्रांतिक सरकारांनी सुरु करावेत असा आग्रह धरला होता. परंतु प्रांतिक सरकारांकडून यासंबंधी कोणतीही ठोस कार्यवाही झाली नव्हती. १९९१ च्या मॉटेग्यू—चेम्सफर्ड सुधारणा कायद्यानुसार उर्जा हा विषय राज्याच्या अखत्यारीत टाकण्यात आला. त्यामुळे केंद्रसरकार यासंबंधी काही निर्णय घेणार नाही, आणि घेऊ इच्छितही नाही हे स्पष्ट झाले.[५] १९४२ पर्यंत भारताचे उर्जाविषयक धोरण असेच होते. याबाबतीत कुठलाही ठोस निर्णय व अंमलबजावणी झाली नव्हती.

दुस—या महायुध्दाच्या काळात लॉर्ड लिनलिथगो यांनी जे. पी. श्रीवास्तव यांच्या अध्यक्षतेखाली वेगवेगळया पाच पूनर्रचना समित्या स्थापन केल्या. यापैकी पब्लिक वर्क ॲन्ड इलेक्ट्रीक पॉवर या समितीचे अध्यक्षपद डॉ. बाबासाहेबांना देण्यात आले. दुस—या महायुध्दाच्या समाप्तीनंतरच्या काळात उर्जेशी संबंधित समस्यांच्या बाबतीत डॉ. आबेंडकरांनी चर्चा करुन अभ्यासपूर्ण माहिती जमा केली आणि उर्जेसंबंधी आपले विचार निश्चित धोरणाच्या माध्यमातून ठामपणे प्रत्यक्षात आणण्यास सुरुवात केली. याच काळात केंद्र सरकारमध्ये डॉ. बाबासाहेबांकडे मजूर व जलसंपदा खात्याची जबाबदारी आली. या जलसंपदा खात्यामध्येच उर्जा विभागाचाही समावेश होता. त्यामुळे डॉ.बाबासाहेब आबेंडकर हे भारताचे पहिले उर्जामंत्री ठरले.[६] डॉ. आबेंडकरांनी उर्जा खात्याची सूत्रे हाती घेईपर्यंत केंद्राचे उर्जाविषयक कोणतेच निश्चित धोरण नव्हते. डॉ. बाबासाहेबांनी वीजनिर्मितीचा परिपूर्ण अभ्यास करुन वीज उत्पादन, वीज विकास आणि वीजपुरवठा या संदर्भातील राष्ट्रीय धोरण आखले.[७] २५ ऑक्टोबर १९४३ रोजी नवी दिल्ली येथे उर्जाविषयक धोरणाबाबत बोलताना डॉ.आबेंडकर म्हणतात, " I emphasize these considerations because what India wants is an assured supply of power, cheap power and abundant power" [८]

## जलविद्युत निर्मितीला प्राधान्य :

कोणत्याही देशाची प्रगती ही वीज उत्पादन व वीज पुरवठयावर आधारलेली असते अशी डॉ. बाबासाहेब आबेंडकरांची आग्रही भूमिका होती. भारतामध्ये उत्पादकता वाढवायची असेल आणि सर्वसामान्यांचे जीवनमान उंचावयाचे असेल तर स्वस्त, स्वच्छ आणि भरपूर वीज मिळाली पाहिजे. यासाठी पायाभूत सुविधांची तरतूर आणि वितरणाचे मोठे जाळे उभे करावे लागेल. स्वच्छ व मुबलक उर्जेच्या बाबतीत डॉ. बाबासाहेबांनी पर्यावरणपूरक जलविद्युत प्रकल्पांचा जोरदार पुरस्कार केला होता. पाण्यापासून मिळणा—या उर्जेमुळे पर्यावरणाचा —हास होणार नाही या फायद्याबरोबरच व अशा उर्जेचे उत्पादन मूल्यही कमी असते याच विचारांनी डॉ.बाबासाहेबांनी जलविद्युत निर्मितीचा आग्रह धरला होता. त्यांचा हा विचार भारतातील परिस्थीतीच्या संदर्भात महत्वाचा ठरला.

भारतासारख्या खंडप्रा:य व भौगोलिक विविधता असलेल्या देशामध्ये एकाच ठिकाणाहून वीज उत्पादन व वितरण करणे शक्य होणार नाही याची डॉ.आबेंडकरांना जाणीव होती. म्हणूनच वीज निर्मितीसाठी व वीज वितरणासाठी प्रत्येक राज्यात स्वतंत्र विद्युत मंडळे निर्माण करण्याला त्यांनी प्राध्यान्य दिले. डॉ.आबेंडकरांच्या या धोरणांवरुन आपणांस असे ठामपणे म्हणता येईल की, 'आधुनिक काळातील राज्य विद्युत मंडळाची संकल्पना आणि त्यांची निर्मिती' यांचा पाया डॉ. बाबासाहेब आबेंडकरांनी फेब्रुवारी, १९४४ मध्ये घातला होता.[९] डॉ. बाबासाहेब आबेंडकर एवढयावरच थांबले नाहीत तर त्यांनी विजेच्या असमोतला संबंधीही महत्वाचे प्रतिपादन केले होते. 'काही राज्यात वीजउत्पादन जास्तीचे होईल पण त्या राज्याची तेवढी गरज असणार नाही. तसेच काही ठिकाणी वीजेची निर्मिती कमी होईल पण वापर जास्त

असेल.' यासाठीच नॅशनल ग्रीड सिस्टिम' आणि रिजनल ग्रीड सिस्टिम तयार करुन सर्वांना वीज पुरवठा करावा असे त्यांचे ठाम मत होते.भारत सरकारने जलविद्युत निर्मितीच्या प्रकल्पांसह वीज निर्मितीसाठी स्वतंत्रपणे काही व्यवस्था केली पाहिजे असा निर्णय डॉ. बाबासाहेबांनी घेतला. त्यांच्या या निर्णयातूनच 'नॅशनल थर्मल पॉवर कॉर्पोरेशन' म्हणजेच औष्णिक उर्जा महामंडळाची स्थापना झाली. आपला उर्जाविषयक विचार प्रत्यक्ष कृतीत आणून त्यांनी आपल्या आग्रही भूमिकेला मूर्त स्वरुप दिले. [१०]

डॉ.बाबासाहेब आबेंडकरांच्या उर्जा निर्मिती आणि त्यायोगे देशाचा औद्योगिक विकास यासंबंधीच्या विचारांसंबंधी देशाचे माजी कृषीमंत्री व लोकनेते मा. शरदराव पवार म्हणतात की, '' विद्युत निर्मिती बाबतची आणि तिच्या वितरणासंबंधीची बाबासाहेबांची त्याकाळची दूरदृष्टी आज समाजासमोर दृग्गोचर झालेली मला दिसत नाही''. महाराष्ट्रात गेल्या पंधरा वर्षांपासून विजेची जाणवणारी टंचाई हे याचे उत्तम उदाहरण होय. आजही भारत सरकारने डॉ. बाबासाहेब आबेंडकरांच्या उर्जाविषयक विचारांचा व धोरणांचा अवलंब केल्यास देशाच्या सर्वच भागात स्वस्त व मुबलक वीज उपलब्ध होण्यास मदत होईल व विकासाचा प्रादेशिक असमतोल दूर होईल अशी खात्री वाटते.

## संदर्भ व टीपा:

१. इदाते भिकुजी, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आबेंडकर विचार आणि कार्य, पुणे विद्यापीठ विद्यार्थी परिषद आणि विद्यार्थी कल्याण मंडळ, पृ.३३
२. कुलकणी सुहास, चंपानेरकर मिलिंद (संपा.), यांनी घडवलं सहस्त्रक, पृ. २००
३. गौतम शिंदे (अनु.), डॉ. बाबासाहेब आबेंडकर—जातीप्रथेचे विध्वंसन, पृ. ५१
४. कुबेर वा.ना, डॉ.आबेंडकर विचारमंथन, पृ.२३७
५. ल ुलेकर प्रल्हाद, अनंत पैलूंचा सामाजिक योध्दा, पृ. ४३
६. तत्रैव. पृ. ४३
७. तत्रैव. पृ.४५
८. डॉ.आबेंडकरस् रोल इन इकॉनॉमिक्स प्लॅनिंग वॉटर ॲन्ड पॉवर सप्लाय पॉलिसी
९. पवार शरद, लोक माझे सांगाती, (राजकीय आत्मकथा) पृ.१२९
१०. तत्रैव.पृ.१२९